# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई- ४०० ०२१
दूरध्वनी : ०२२ -२२०२६२४९, २२८३५२४७ व २२०२५३५४(थेट)
फॅक्स : २२८२११६१


जा.क्र.मजीप्रा/मलोआ/सकाअ/नियुक्ती/२००८/आ-१ दिनांक :- २९.११.२०१६

**महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा,गट-अ (मुख्य) परीक्षा २०१३ सहाय्यक कार्यकारी अभियंता (गट-अ) (स्थापत्य) या पदावर सरळ सेवेवरील नियुक्त्या.**

## // कार्यालयीन आदेश //

**वाचा** :- १) महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई, यांचे दिनांक २८ एप्रिल,२०१६ रोजीचे पत्र.
२) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक मजीप्रा-२०१०/प्र.क्र.२९०/पापु-२३/ दिनांक ३१ मे, २०१६

महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा, गट-अ परिक्षा २०१३ सहायक कार्यकारी अभियंता (स्थापत्य) गट-अ या पदावरील नियुक्तीसाठी सरळसेवा भरतीद्वारे घेण्यात आलेल्या एकत्रित स्पर्धात्मक परिक्षेच्या निकालावर आधारित महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई यांच्या संदर्भित दिनांक २८ एप्रिल,२०१६ च्या पत्रान्वये, सहायक कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावर नियुक्तीसाठी शिफारसप्राप्त ३६ उमेदवारांपैकी खालील विवरणपत्रातील सद्यस्थितीत नियुक्तीस पात्र ठरलेले उमेदवार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये ते रुजू होतील त्या दिनांकापासून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी सहायक कार्यकारी अभियंता (स्थापत्य) म्हणून रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे रु.५४०० या वेतनश्रेणीत त्यांच्या नावासमोरील स्तंभ-७ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | म.लो. आ. यादीतील क्रमांक | उमेदवारांचे नांव | जातीचा प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | महसुल विभाग | प्रस्तावित पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १० | श्री.गणेश शिवाजी भोगावडे | खुला | खुला | अमरावती | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन उपविभाग, कारंजा |
| २ | १२ | श्री.सुबोध मनोहर मोरे | खुला | खुला | नाशिक | ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग, यावल, जिल्हा परिषद, जळगांव |

२. सहाय्यक कार्यकारी अभियंता (स्थापत्य) गट-अ मधील उमेदवारांची नियुक्ती ही दोन वर्षाचा परिविक्षाकाळ समाधानकारकरित्या पूर्ण करण्याच्या व खालील विहित शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन राहिल.

अ) उमेदवाराने नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत त्यांच्या नेमणूकीच्या ठिकाणी रुजू झाले पाहिजे. अन्यथा एक महिन्यानंतर सदर नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील. कार्यालय प्रमुखांनी एक महिन्यानंतर रुजू होणाऱ्या अभियंत्यास रुजू करुन घेवू नये.